अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com

। शुक्रवार, दि. २१ मार्च २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १७१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



सोलापूर शहराचे तापमान

कमाल तापमान **३९.५**

किमान तापमान **२५.५**

## सिद्धेश्वर नगरात पत्नीला कुऱ्हाडीने मारहाण

**सोलापूर** : घरातील किरकोळ तक्रारींवरून पतीने कुऱ्हाड आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून पत्नीला जखमी केले. ही घटना नईजिंदगी परिसरातील सिद्धेश्वर नगर भाग ३ येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. शबाना मैनोद्दीन पिरजादे (वय ३५ रा. सिद्धेश्वरनगर) असे जखमी झालेल्या विवाहीतेचे नाव आहे. तिला उपचारासाठी दिराने शासकीय रुग्णालयात दाखल केले. दुपारी अकराच्या सुमारास शबाना हिचे पतीबरोबर तक्रार झाली होती. त्यावेळी रागाच्या भरात मैनोद्दीन याने तिला मारहाण केली. याची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

# तळेहिप्परग्यात बेडरूममध्ये डॉक्टराचा मृत्यू

# आत्महत्या की नैसर्गिक मृत्यू? रात्री उशिरापर्यंत गूढ कायम

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

**नितीन माने-देशमुख (वय ४८, रा. विनायक नगर तळेहिप्परगा) या डॉक्टरच्या मृत्यूचे गूढ गुरुवारी रात्री ११ वाजेपर्यंत कायम राहिले. त्यांचा मृत्यू हा नैसर्गिक झाला की त्यांनी आत्महत्या केली याबद्दलची ठोस माहिती समोर आली नाही. डॉ. माने-देशमुख यांचा मृतदेह रात्री १२ वाजण्याच्या सुमारास नातेवाईकांसह जोडभावी पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी सिव्हील हॉस्पिटलमध्ये उत्तरीय तपासणीसाठी आणला. त्यांच्या शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर मृत्यूचे खरे कारण समोर येणार असल्याचे जोडभावी पोलिस ठाण्याच्या सूत्रांकडून सांगण्यात आले.**

- शवविच्छेदनानंतर मृत्यूचे खरे कारण येणार पुढे
- रात्री उशिरा मृतदेह सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल
- गळा चिरुन आत्महत्या केल्याच्या अफवेने खळबळ

दरम्यान डॉ.नितीन माने-देशमुख यांनी गळा चिरुन घेऊन आत्महत्या केली अशी अफवा गुरुवारी (ता.२०) रात्री सात-साडेसातनंतर पसरविली गेली. त्यामुळे तिळेहिप्परगा परिसरात एकच खळबळ माजली. रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान जोडभावी पोलीस ठाण्यात घटनेसंबंधी खबर पोहचली. तद्नंतर या पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण यांच्यासह त्यांच्या पथकाने घटनास्थळी तातडीने पोचून सुक्ष्म पाहणी करत डॉ. माने-देशमुख यांच्या कुटुंबातील सदस्यांकडून माहिती जाणून घेतली. डॉक्टरांना उशिरापर्यंत झोपण्याची सवय होती. त्यामुळे ते उठले नसतील म्हणून कुटुंबातील सदस्यांनी त्यांच्या उठण्याकडे दुर्लक्ष केले. सायंकाळचे ७ वाजले तरी डॉक्टरांची बेडरूम बंद आहे, आणि ते कुठे दिसत नाहीत यावरून त्यांच्या घरातल्यांना शंका आहे. त्यानंतर बेडचा दरवाजा तोडण्यात आला.

मृत नितीन माने-देशमुख हे (विनायक नगर तळेहिप्परगा) येथे वास्तव्यास होते. तिथे असलेल्या त्यांच्या घराच्या तळमजल्यावर त्यांचा दवाखाना असून वरच्या मजल्यावर हे राहायला होते.

वैद्यकीय व्यवसाय ते संबंधित ठिकाणी करीत होते. काल बुधवारी (ता.१९) रात्री साडेदहा अकरा वाजण्याच्या दरम्यान ते आपल्या बेडरुममध्ये झोपायला गेले. गुरुवारी (ता.२०) सायंकाळपर्यंत ते बेडरूममधून बाहेर आल्याचे दिसले नाही. त्यांच्या बेडरुमचा दरवाजा आतून बंद होता.

यादरम्यान गुरुवारी डॉ. माने-देशमुख यांच्या कुंटुबातील सदस्यांनी बेडरुमचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला तेव्हा त्यांना डॉक्टर मृत अवस्थेत दिसून आले. त्यांच्या मृतदेहाला मुंग्या लागल्याचे दिसून आले. डॉक्टरांचा मृत्यू झाल्याचे कळताच कुंटुबातील सदस्यांनी हंबरडा फोडला. त्यांच्या गळ्याला मुंग्या लागल्याने त्यांनी गळा चिरुन आत्महत्या केली असावी की काय? असा अंदाज बांधून काही बघ्यांनी तशी अफवा पसरवली. या परिसरातील गुरवारी सायंकाळपासून रात्री उशीरापर्यंत बघ्यांची गर्दी जमली होती.



**तळेहिप्परगा : डॉ. नितीन माने-देशमुख यांच्या मृत्यूची वार्ता पसरल्यानंतर विनायक नगरातील त्यांच्या निवासस्थानी बघ्यांची झालेली गर्दी.**




**तळेहिप्परगा : डॉ. नितीन माने-देशमुख यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नेण्यापूर्वी घटनास्थळी दाखल झालेले जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे पथक.**

> घटनास्थळी जाऊन पाहणी केली. संबंधित मृत व्यक्तीची हालचाल दोन वाजेपर्यंत होती. तद्नंतर हालचाल थांबली, डॉक्टराचा मृतदेह ज्या रुममध्ये आढळून आला आहे, त्या खोलीमधील सीसीटीव्ही फुटेजमध्ये मृतदेहाला मुंग्या लागल्याचे दिसून आले. मृत व्यक्तीच्या गळ्याच्या भोवती मुंग्या आढळून आल्या. मात्र आत्महत्या वगैरेचा प्रकार असावा असे वाटत नाही. मृत व्यक्तीकडून प्रतिसाद मिळेना झाल्यावर कुटुंबातील सदस्यांनी दारे तोडून संबंधित खोलीत प्रवेश मिळविला. संबंधित मृत व्यक्तीला आजार होता. तो पाच-पाच दिवस जेवण नव्हता, अशी माहिती त्याच्या नातेवाईकांकडून मिळाली. सकृतदर्शनी मृतदेहासंबंधी ही माहिती मिळाली. शवविच्छेदन रिपोर्ट आल्यानंतर घटनेची माहिती समोर येईल.
> **-सुहास चव्हाण, पोलीस निरीक्षक, जोडभावी पेठ पोलीस ठाणे, सोलापूर**

### रात्री दोन नंतर डॉक्टराच्या शरिराच्या थांबल्या हालचाली

वासुदेव नगरातील ज्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरच्या बेडरुममध्ये डॉ. नितीन माने-देशमुख झोपले होते. त्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज जोडभावी पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी तपासले. रात्री साधारण दोन नंतर डॉ. माने-देशमुखांच्या शरिराच्या हालचाली पूर्णपणे थांबल्याचे दिसले. तत्पूर्वी झोपतेच त्यांच्या शरिराच्या काही हालचाली सीसीटीव्ही फुटेजमधून दिसून आल्या आहेत. त्यांचा मृत्यू गुरुवारी मध्यरात्रीनंतर दोन वाजण्याच्या सुमारास झाल्याचे यावरून स्पष्ट होते.

### डॉ. माने-देशमुखांना हृदयविकाराचा त्रास

साधारण ४८ वर्षे वय असलेल्या डॉ. माने-देशमुख यांना मागील काही वर्षांपासून हृदयविकाराचा तीव्र त्रास होता. हृदयविकाराच्या झटक्याने झोपेत त्यांच्या मृत्यू झाला असावा, असाही अंदाज त्यांच्या मृत्यूबाबतीत व्यक्त करण्यात आला.

# सोलापूरच्या फौजदार चावडी पोलीस ठाण्यात 'नाईंट्या'चा धुडगूस

# अंगावर थुंकून चक्क पोलीस निरीक्षकासह कर्मचाऱ्यावर उचलला हात




- दारुच्या नशेत तर्रर असलेल्या नाईंट्याचा हौसे वस्ती, रामलाल चौकात कोयता अन् काठीने मारहाण करुन पोलीस ठाण्यात राडा
- पोलीस ठाण्यात दबंगगिरी करणाऱ्या नाईंट्याला तीन दिवस पोलीस कोठडी
- 'खाकी'वर्दी वर थुंकून हात उचलणारा नाईंट्या सराईत गुन्हेगार, एकाच दिवशी ५ गुन्हे अंगावर

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

आरोपींना कायद्याचा धाक किंवा पोलिसांची जरब राहिली नसल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. कायद्याचे रक्षण करणाऱ्या 'खाकी' वर्दीच्या अंगावर 'हात' उचलण्याच्या घटना घडत आहेत. नागपूरमध्ये उसळलेल्या दंगली दरम्यान एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या हातावर कुऱ्हाडीने वार करण्याचे अघोरी धाडस माथेफिरुने करण्याचे प्रकरण अत्यंत ताजे असतानाच, सोलापुरातील फौजदार चावडी पोलीस ठाण्यात एका माथेफिरुने दारुच्या नशेत धुडगूस घातला. तत्पूर्वी पोलिस कर्मचारी दिनेश घंटे यांच्या शर्टाला झोंबा-झोबी करत रिक्षात त्यांना शिवीगाळ करुन त्यांच्या अंगावर थुंकण्याचा प्रकार केला. तद्नंतर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात समजावताना पोलीस निरीक्षक अनंत माने यांना मारहाण केली. याप्रकरणी सराईत गुन्हेगार नाईंट्या ऊर्फ ओंकार संतोष नलावडे (रा. बांद वस्ती, सुंदरबाई डागा प्रशालेजवळ, दमाणी नगर सोलापूर) याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १३२,३२१(१)३५२, ३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



विशेष म्हणजे फौजदार चावडी पोलीस ठाण्यात राडा घालण्यापूर्वी नाईंट्या ऊर्फ ओंकार संतोष नलावडे याने हौसे वस्ती आणि रामलाल चौक या ठिकाणी दोघांना कोयता आणि काठीने मारहाण करुन जखमी केले. त्याबद्दल भारतीय न्याय संहिता कलम ३०७ अन्वये, स्वतंत्र गुन्हा फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.मारहाणीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. त्याला शनिवार (ता.२३) तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पोलीस कॉन्स्टेबल दिनेश नारायण घंटे यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, संशयित आरोपी नाईंट्या व इतर दोन ते तीन इसम यांच्यात रामलाल चौक परिसरात प्रजा मटन स्टॉल या दुकानाजवळ तक्रार चालू होती. यादरम्यान आरोपींने तेथे एकास काठीने मारहाण केली. त्यानंतर तो स्वतःहून रस्त्याच्या कडेला असलेल्या फुटपाथवर स्वतः चे डोके व तोंड आपटून घेत होता. यावेळी त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव चालू होता.

या घटनेदरम्यान फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे कर्मचारी दिनेश घंटे हे संशयित आरोपी नाईंट्या यास रिक्षातून फौजदारी पोलीस ठाण्याकडे घेऊन येत होते. यावेळी रिक्षामध्ये फिर्यादी पोलीस कर्मचारी घंटे यांच्या अंगावर थुंकून नाईंट्या याने शिवीगाळ करता त्यांच्या शर्टाला धरुन ओढा-ओढी केली.

तद्नंतर फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे उपचाराची वैद्यकीय यादी तयार करीत असताना आरोपींने शिवीगाळ करुन परत पोलिस कर्मचारी घंटे यांच्या अंगावर थुंकण्याचा प्रकार केला. शिवाय यावेळी तो मोठ्याने आरडाओरड करीत होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने हे त्यास शांत बसण्यास सांगत असताना त्याने माने यांच्या छातीवर डाव्या बाजूस हाताने बुक्की मारली. यादरम्यान त्याला अडवत असताना त्याने हाताने त्यांच्या उजव्या हाताच्या मनगटाजवळ मारल्याने त्यांना जबरी मुक्का मार लागला. संशयित आरोपी नाईंट्या ऊर्फ संतोष नलावडे याने पोलिसांच्या शासकीय कामात अडथळा आणून फिर्यादीस धक्काबुक्की करुन करण्यासह पोलीस निरीक्षक अनंत माने यांच्या छातीवर आणि हाताच्या मनगटाजवळ मारुन जबर दुखापत केली आहे.याबद्दल त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

### नाईंट्याने दोन ठिकाणी मारहाण करुन

पोलीस ठाण्यात पुन्हा राडा

संशयित आरोपी ऊर्फ संतोष नलावडे यांने हौसे वस्ती येथे किरण नागटिळक यांना कोयत्याने मारहाण केली. त्यानंतर तो रामलाल चौकात आला. तिथे प्रजा मटन स्टॉल शेजारी पुन्हा तिथे एकास मारहाण केली. त्यानंतर त्याने पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक यांनाच मारहाण करण्याचा प्रकार केला.

### रंगाचा बेरंग; पठ्ठ्याच्या विरोधात पाच गुन्हे दाखल

बुधवारी रंगपंचमीनिमित्त संशयित आरोपी नाईंट्याने मद्यप्राशन केले होते. त्याच्या तंद्रीत या माथेफिरुने तीन ठिकाणी कोयता, काठी आणि हाताने मारहाण केली. शासकीय कामात अडथळा आणण्यासह जबरी मारहाण करणे या अंतर्गत त्याच्यावर ५ गुन्हे दाखल झाले.

> संशयित आरोनी नाईंट्या ऊर्फ संतोष नलावडे हा सराईत गुन्हेगार आहे. यापूर्वीदेखील त्याच्यावर वेगवेगळ्या कारणांवरुन गुन्हे दाखल आहे. बुधवार (ता.१९) केलेल्या कृत्यांच्या अनुषंगाने, ५ गुन्हे दाखल झाले. कलम ३०७ गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर, त्याला गुरुवार (ता.२०) न्यायालयासमोर उभे करण्यात आले होते. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. घटनांच्या अनुषंगाने, पुढील तपास सुरु आहे.
> **-रोहन खंडागळे,** सहायक पोलीस निरीक्षक, फौजदार चावडी पोलीस ठाणे सोलापूर

### काही लक्ष्यवेधी नोंदी

- हौसे वस्ती येथे मारहाण करुन रामलाल चौकात नाईंट्याबरोबर आलेले तिघे पसार
- बुधवार (ता.१९) रात्री फौजदार चावडी पोलिस ठाण्यात नाईंट्याने घातला राडा
- नाईंट्याने गुन्ह्यात वापरलेला कोयता, काठी जप्त

### किरण नागटिळकवर नाईंटकडून कोयत्याने हल्ला

हौसे वस्ती परिसरात नाईंट्याने किरण नागटिळक या तरुणावर कोयत्यांने हल्ला करुन त्याचे डोके फोडले. डोक्यावर तसेच हातावर कोयत्याने वार करुन किरण नागटिळक यास मारहाण केली. त्याबद्दल नाईंट्या ऊर्फ संतोष नलावडे याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ३०७ अन्वये, फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, याप्रकरणी त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याचे फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे अधिकारी नितीन जाधव यांनी सांगितले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**विकास कामांच्या फाईली उगाचच टेबल अडवताहेत!**

कल्याण
120-33-788

मुंबई
347-44-590

# मार्केट कमिटीचा बिगुल वाजला, इच्छुकांनी सुस्कारा टाकला

**सोलापूर/प्रतिनिधी**

**राज्यातील विक्रमी आर्थिक उलाढालीसाठी दुसऱ्या स्थानावर असलेल्या सोलापूर बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीचे दीड वर्षापासून भिजत पडलेले घोंगडे अखेर वाळण्याच्या मार्गावर आले आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणुकीचा बिगुल अखेर वाजला आहे. २७ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत भाजपच्या तीन आमदारांची भूमिका काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

बाजार समितीच्या राजकीय आखाड्यात अनेक पैलवानांनी दंड थोपटण्यास सुरुवात केली आहे. बाजार समितीच्या गत पंचवार्षिक निवडणुकीत तत्कालीन सहकारमंत्री सुभाष देशमुख विरुद्ध माजी आमदार दिलीप माने यांच्या पॅनेलमध्येच निवडणूक झाली होती. तत्कालीन पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांनी माने यांच्या पॅनेलमधून निवडणूक लढले होते. त्यामुळे या निवडणुकीकडे भाजप विरूद्ध भाजप असेच पाहिले गेले.

जून २०१८ मध्ये झालेल्या निवडणुकीत दिलीप माने यांच्या पॅनेलला एक हाती सत्ता मिळाली होती. आ. विजयकुमार देशमुख यांनी सभापतीपद मिळवले होते. त्यानंतर आता बाजार समितीच्या आखाड्यात सात वर्षांनंतर पुन्हा एकदां भाजप विरुद्ध भाजप असाच सामना होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. गतवेळी दोन्ही देशमुख मंत्री होते. आता दोन्ही देशमुख आमदार आहेत. यंदा बाजरा समितीच्या निवडणुकीत अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अधिकच इंटरेस्ट घेतला आहे. त्यामुळे या तिन्ही आमदारांची भूमिका काय असणार याची उत्सुकता आहे.

गतवेळी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात सिद्धाराम म्हेत्रे यांच्या रूपाने काँग्रेसचा एकमेव आमदार बाजार समितीच्या निवडणुकीच्या रिंगणात होते. गतवेळी निवडणुकीत शेतकऱ्यांना मिळालेल्या मतदानाच्या अधिकारातून बाजार समितीची निवडणूक झाली. त्यामुळे आमदार विजयकुमार देशमुख यांच्यासह अनेकांचा बाजार समितीत प्रवेश झाला होता. यंदाची निवडणूक ग्रामपंचायत आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या मतदारांमधून होणार आहे. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील सहकारात माजी आमदार दिलीप माने, सोलापूर जिल्हा बँकेचे माजी संचालक सुरेश हसापुरे यांच्याकडे ग्रामपंचायत व सोसायटीच्या मतदारांची निर्णायक ताकद आहे. त्यामुळे या दोघांचा कौल कोणाकडे? यावर देखील बाजार समितीचे राजकिय भवितव्य अवलंबून आहे.

### खासदार प्रणिती शिंदे समोर तगडे आव्हान

आमदारकीच तिकीट न मिळाल्याने दिलीप माने,तर हसापुरे हे देखील भाजप आमदार सुभाष देशमुख यांच्या संपर्कात असल्याचे बोलले जात आहे. उत्तर आणि दक्षिणचे वर्चस्व बाजार समितीवर आहे. यातच दोन्ही आमदार देशमुखांच्या जोडीला आता अक्कलकोटचे आमदार कल्याणशेट्टी यांनीही निवडणुकीमध्ये इंटरेस्ट दाखवला आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत अनेक राजकीय घडामोडी घडणार आहेत.